**महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत विशेष कार्यक्रम अधिकारी - मग्रारोहयो (Special Programme Officer - MGNREGA) यांच्या पदांना मुदतवाढ व काही पदे निरसित करण्याबाबत........**

**महाराष्ट्र शासन**
**नियोजन विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः आस्थाप २०१३/प्र.क्र.२१/मग्रारो-३**
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
तारीख: २० जुलै, २०१६.

**वाचा -**

१) शासन निर्णय क्रमांकः **आस्थाप - २०१३/प्र.क्र.२१/मग्रारो-३, दि. २०.६.२०१३.**
२) शासन निर्णय क्रमांकः **आस्थाप - २०१५/प्र.क्र. ८८/मग्रारो-३, दि. २४.७.२०१५**

**प्रस्तावना -**

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत राज्यामध्ये ज्या तालुका / पंचायत समित्यांमध्ये जास्त प्रमाणात कामे चालू आहेत व जास्तीत जास्त मजूर उपस्थिती आहे अशा ७५ तालुक्यांमध्ये "विशेष कार्यक्रम अधिकारी-मग्रारोहयो" (Special Programme Officer-MGNREGA) यांची नायब तहसिलदार गट-ब या संवर्गातील ७५ पदे संदर्भाधीन अ.क्र. १ मध्ये नमूद शासन निर्णयान्वये निर्माण करण्यात आली होती. त्यापैकी २१ पदे रिक्त असल्याची बाब निदर्शनास आल्याने, संदर्भाधीन अ.क्र. २ मध्ये नमूद शासन निर्णयाच्या दिनांकापासून सदर पदे निरसित करण्यात आली. आता "विशेष कार्यक्रम अधिकारी-मग्रारोहयो" (Special Programme Officer-MGNREGA) यांची नायब तहसिलदार गट-ब या संवर्गातील ५४ पदांची मुदत दिनांक ३०.६.२०१६ रोजी संपुष्टात आली आहे. मात्र सद्य:स्थितीत उक्त ५४ पदांपैकी १४ पदे दिनांक ३०.६.२०१६ रोजी भरलेली असल्याने सदर पदांना मुदतवाढ देण्याचा व दिनांक ३०.६.२०१६ रोजी रिक्त असलेली ४० पदे निरसित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्या अनुषंगाने पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

**शासन निर्णय-**

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत राज्यामध्ये ज्या तालुका / पंचायत समित्यांमध्ये जास्त प्रमाणात कामे चालू आहेत व जास्तीत जास्त मजूर उपस्थिती आहे अशा तालुक्यांमध्ये सध्या कार्यरत असलेली "विशेष कार्यक्रम अधिकारी-मग्रारोहयो" (Special Programme Officer-MGNREGA) यांच्या नायब तहसिलदार गट-ब या संवर्गातील "प्रपत्र - अ" मध्ये दर्शविलेल्या १४ पदांना दिनांक ३१.८.२०१६ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे. सदर पदे शासन निर्णय क्रमांक : आस्थाप-२०१३/प्र.क्र.२१/मग्रारो-३, दिनांक २०.६.२०१३ सोबतच्या प्रपत्र-२ मध्ये ठरवून देण्यात आल्याप्रमाणे कर्तव्ये व जबाबदा-या पार पाडतील. दिनांक ३१.८.२०१६ नंतर कोणत्याही परिस्थितीत सदर पदांना मुदतवाढ देण्यात येणार नाही. थोडक्यात सदर पदे दिनांक ३१.८.२०१६ (म.नं.) निरसित होतील. निरसित होणारी पदे संबंधित विभागीय आयुक्त यांनी यापुढे भरु नयेत.

२. "विशेष कार्यक्रम अधिकारी-मग्रारोहयो" (Special Programme Officer-MGNREGA) यांच्या नायब तहसिलदार गट-ब या संवर्गातील "प्रपत्र - अ" मध्ये दर्शविलेल्या १४ पदांवर दिनांक ३१.८.२०१६ पर्यंत होणारा खर्च केंद्र शासनाकडून महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत उपलब्ध होणाऱ्या निधीपैकी प्रशासकीय खर्चासाठी अनुज्ञेय असलेल्या ६% निधीतून संबंधित जिल्हाधिकारी कार्यालयांकडून भागविण्यात येईल.

३. "विशेष कार्यक्रम अधिकारी-मग्रारोहयो" (Special Programme Officer-MGNREGA) यांच्या नायब तहसिलदार गट-ब या संवर्गातील "प्रपत्र - ब" मध्ये दर्शविलेली ४० पदे दिनांक ३०.६.२०१६ रोजी रिक्त असल्याने, सदर पदे दिनांक ३०.६.२०१६ (म.नं.) पासून निरसित करण्यात येत आहेत. निरसित करण्यात आलेली पदे संबंधित विभागीय आयुक्त यांनी यापुढे भरु नयेत.

४. सदर पदे निरसित झाल्याने/ होणार असल्याने शासन निर्णय क्रमांक : आस्थाप-२०१३/प्र.क्र.२१/मग्रारो-३, दिनांक २०.६.२०१३ सोबतच्या प्रपत्र-२ मधील मुद्दा क्रमांक १८ मध्ये नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

५. सदर आदेश तात्काळ अंमलात येतील.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०७२०११२११६८२१६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Prashant Ramesh Pimpale

Digitally signed by Prashant Ramesh Pimpale
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Section Officer, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Prashant Ramesh Pimpale
Date: 2016.07.22 16:37:22 +05'30'

**(प्रशांत र. पिंपळे)**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

प्रत,

१. अपर मुख्य सचिव (महसूल), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
२. प्रधान सचिव (रोहयो), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
३. प्रधान सचिव (नियोजन), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
४. प्रधान सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
५. प्रधान सचिव (लेखा व कोपागारे), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
६. सर्व विभागीय आयुक्त.
७. सर्व जिल्हाधिकारी (मुंबई शहर व उपनगर वगळून)

८. सर्व उप आयुक्त (रोहयो), विभागीय आयुक्त कार्यालय.
९. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,
१०. सर्व उपजिल्हाधिकारी (रोहयो), जिल्हाधिकारी कार्यालय (मुंबई शहर व उपनगर वगळून).
११. प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१, मुंबई.
१२. प्रधान महालेखापाल (लेखापरीक्षा), महाराष्ट्र-१, मुंबई.
१३. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-२, नागपूर.
१४. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-२, नागपूर.
१५. सर्व उप सचिव, अवर सचिव व कक्ष अधिकारी (रोहयो प्रभाग), मंत्रालय, मुंबई - ३२.
१६. सारसंग्रहासाठी, मग्रारो-१, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
१७. निवडनस्ती, मग्रारो-३, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

**शासन निर्णय क्रमांक आस्थाप : २०१३/प्र.क्र.२१/मग्रारो-३ , दिनांक २० जुलै, २०१६ सोबतचे**

**प्रपत्र -अ**

विशेष कार्यक्रम अधिकारी-मग्रारोहयो (Special Programme Officer – MGNREGA) यांच्या दिनांक ३१.८.२०१६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेल्या पदांचा महसूल विभागनिहाय, जिल्हानिहाय व तालुकानिहाय तपशील

| अ. क्र. | महसूली विभाग | जिल्हा | तालुक्यांचे नाव | मुदतवाढ द्यावयाच्या पदांची संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | **नाशिक विभाग** | नाशिक | सिन्नर | ०१ |
| २ | | धुळे | धुळे, साक्री | ०२ |
| ३ | **पुणे विभाग** | सातारा | माण, खटाव | ०२ |
| ४ | | सोलापूर | करमाळा | ०१ |
| ५ | | कोल्हापूर | करवीर | ०१ |
| ६ | **औरंगाबाद विभाग** | औरंगाबाद | वैजापूर | ०१ |
| ७ | | हिंगोली | औंढा नागनाथ, कळमनुरी | ०२ |
| ८ | | नांदेड | कंधार, लोहा, मुखेड | ०३ |
| ९ | | लातूर | औसा | ०१ |
| **एकूण** | | | | **१४** |

*********************

**शासन निर्णय क्रमांक : आस्थाप २०१३/प्र.क्र.२१/मग्रारो-३, दिनांक २० जुलै, २०१६ सोबतचे**

**प्रपत्र -ब**

**विशेष कार्यक्रम अधिकारी-मग्रारोहयो (Special Programme Officer - MGNREGA) यांची सध्या रिक्त असलेली ४० पदे निरसित करण्याबाबत महसूली विभागनिहाय, जिल्हानिहाय व तालुकानिहाय तपशील**

| अ.क्र. | महसूली विभाग | जिल्हा | तालुक्यांचे नाव | निरसित करावयाच्या पदांची संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | **कोकण विभाग** | ठाणे | वाडा | ०१ |
| २ | | रत्नागिरी | दापोली | ०१ |
| ३ | | सिंधुदुर्ग | देवगड | ०१ |
| ४ | **नाशिक विभाग** | नाशिक | सुरगणा | ०१ |
| ५ | | नंदूरबार | अक्कलकुवा | ०१ |
| ६ | | जळगाव | चाळीसगाव | ०१ |
| ७ | | अहमदनगर | अकोले, पारनेर, पाथर्डी | ०३ |
| ८ | **औरंगाबाद विभाग** | औरंगाबाद | कन्नड | ०१ |
| ९ | | जालना | भोकरदन, परतूर | ०२ |
| १० | | परभणी | जिंतूर | ०१ |
| ११ | | बीड | बीड, पाटोदा | ०२ |
| १२ | | नांदेड | किनवट | ०१ |
| १३ | | उस्मानाबाद | परांडा | ०१ |
| १४ | **अमरावती विभाग** | अमरावती | चिखलदरा, धारणी, अचलपूर | ०३ |
| १५ | | अकोला | पातूर | ०१ |
| १६ | | वाशिम | रिसोड, मंगरुळपीर | ०२ |
| १७ | | बुलडाणा | लोणार, संग्रामपूर, सिंदखेडराजा | ०३ |
| १८ | | यवतमाळ | कळंब, घाटंजी, बाभुळगाव | ०३ |
| १९ | **नागपूर विभाग** | भंडारा | मोहाडी, तुमसर, भंडारा | ०३ |
| २० | | गोंदिया | देवरी, सडक अर्जुनी | ०२ |
| २१ | | चंद्रपूर | नागभीड, चिमूर | ०२ |
| २२ | | गडचिरोली | कुरखेडा, चामोर्शी, कोरची, आरमोरी | ०४ |
| | | | **एकूण** | **४०** |